तपासिक अंमलदार यांना

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** जामखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0474 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/10/2023 22:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 17/10/2023

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/10/2023

**Time From (वेळेपासून):** 10:07 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/10/2023 **Time (वेळ):** 22:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/10/2023 22:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वराट हस्पीटल जवळ, खाडेनगर,जामखेड, ,जामखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदिप उत्तमराव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा वराट हस्पीटल जवळ, खाडेनगर,जामखेड,जामखेड,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | रा वराट हस्पीटल जवळ, खाडेनगर,जामखेड,जामखेड,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष शांतीनाथ अष्टेकर | | | 1. रा तपनेश्वर गल्ली, महेश मेडीक, जामखेड,जामखेड,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** **(**प्रथम खबर हकीकत **):**

फिर्याद दि.17/10/2023

मी संदिप उत्तमराव शिंदे , वय-45 वर्षे, धंदा सिनेकलाकार ,रा. वराट हॉस्पीटल जवळ, खाडेनगर,जामखेड, ता. जामखेड, जि.अहमदनगर. मो.नं. 9822496367

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मी दि.16/10/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री.गोर्डे यांना फोन करुन एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि.17/10/2023 रोजी सकाळी 09/15 वा चे सुमारास जामखेड येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 09/15 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री.गोर्डे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टॉफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी श्री. गोर्डे यांचे सुचने वरुन शासकीय वाहनात बसलो व दोन शासकिय पंचासमक्ष लोकसेवकांविरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली ती मला माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगीतली असता मी सन 2020 मध्ये माझ्या जामखेड येथील राहत्या घराजवळ गट नं 1165/1 मध्ये 1089 चै. फुट क्षेत्र असलेला प्लॉट खरेदी केलेला आहे, त्यावर मी इमारत बांधकाम करीत आहे,त्या प्लॉटच्या समोर 3-4 फुटावरुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची विदयुत वाहीनी गेलेली आहे, इमारतीचे पुढील बाजुचे काम सुरक्षीतरित्या करण्यासाठी विदयुत पुरवठा खंडीत करावा लागत असल्यामुळे मी आमच्या भागातील वायरमन श्री. संतोष अष्टेकर यांना विनंती केली असता त्यांनी माझ्याकडे विदयुत पुरवठा खंडीत करण्यासाठी प्रत्येक वेळचे 500/- रुपये प्रमाणे लाच मागणी करुन अगोदर 500/- फी म्हणुन घेवुन उर्वरीत 2000/- लाच मागणी करत असल्याबाबत पोनि श्री.गोर्डे यांचेकडे सविस्तर तक्रार दिली होती.

त्यानंतर मी अष्टेकर यांचे विरुध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि श्री. गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. पोलीस निरीक्षक श्री.गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे पोना चौधरी यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोना चौधरी यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस निरीक्षक श्री.गोर्डे दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोना चैधरी यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. पोलीस निरीक्षक श्री. गोर्डे यांनी मला पंच नं 1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने रवाना केले, त्याप्रमाणे आम्ही रवाना झालो. मी व पंच नं. 1 असे माझ्या जामखेड येथील इमारतीचे बांधकाम चालु असलेल्या प्लॉटजवळील डीपी जवळ गेलो,त्याठिकाणी जावुन मी अष्टेकर यांना त्यांचा मोबाईल क्र.8149297075 यावर माझा मोबाईल क्र.9822496367 यावरुन कॉल केला पण त्यांचा नंबर वेटींगवर होता, त्यानंतर लगेचच त्यांचा मला कॉल आला त्यावेळी अष्टेकर म्हणाले, डी पी जवळ या, काम झाल्यावर देणार का कामाच्या अगोदर?त्यावेळी मी त्यांना म्हणालो, आज देवुन टाकतो, तुझा एक रुपया ठेवणार नाही त्यावर ते म्हणाले, मी चार वेळा लाईट बंद करुन दिली, आजचा पाचवा दिवस आहे, प्रत्येक वेळचे 500/- प्रमाणे 2500/- रुपये होतात, तुम्ही मला अगोदर 500/-रुपये दिले आहेत, आजच्या सहीत पाच वेळा होतात, आजच्या सहीत दोन हजार रुपये होतेन आता असे म्हणुन 2000/- रुपये लाच मागणी केली.

त्यानंतर अष्टेकर व त्यांचे सोबत सांगळे नावाचा इसम असे माझ्या ईमारत बांधकाम चालू असलेल्या प्लॉट जवळील डीपी जवळ आले.त्यावेळी आमच्यात परत कामाबाबत चर्चा झाली त्यावेळी अष्टेकर म्हणाले, मी एकदा डीपी बंद करायचे 3500/- रुपये घेतो, तुम्हाला जास्त सांगणार नाही, आजचे बंद करण्यासहीत आपले 2500/- रुपये होतेत, तुम्ही 500/- दिले खाली 2000/- रुपये राहिले,जावा पटकन पैसे आणुन दया असे म्हणुन त्यांनी

पंचासमक्ष माझ्याकडे 2500/- रुपये लाच मागणी केली त्यातील अगोदर 500/- रुपये लाच घेतल्याचे मान्य करुन उर्वरीत 2000/- रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले.त्यांनतर त्यांनी डी पी चे फ्युज काढले व डी पी ची चावी माझ्याकडे दिली, त्यानंतर मी एटीएम मधुन येतो असे म्हणुन मी व पंच सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो घडलेला प्रकार पंच क्र.1 यांनी व मी पोनि गोर्डे यांना सांगीतला त्यानंतर पोनि गोर्डे व पंच तसेच सापळा पथकातील अंमलदार यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्डींग ऐकली असता अष्टेकर यांनी माझ्याकडे 2500/-लाच मागणी करुन या अगोदर 500/- लाच स्वीकारल्याचे व उर्वरित 2000/- लाच स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर अष्टेकर यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 2000/-रुपये त्यात 500/- रुपये दराची 01, 200/- रुपये दराच्या 02, व 100/- दराच्या 11 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोनि गोर्डे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोना चैधरी यांनी करून दाखवीले. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली, एका को-या कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. पोनि गोर्डे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. पोकॉ चैधरी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले.त्यावेळी अष्टेकर यांचा माझ्या मोबाईलवर कॉल आला तो मिस्ड झाला त्यामुळे मी त्यांना कॉल बॅक केला असता त्यांनी मला डी पी जवळ येण्यास सांगीतले, त्यावेळी पोनि गोर्डे यांचे सुचनेवरुन मी माझ्या मोबाईलचा स्पीकर ऑन केला होता, आमच्यात झालेले ते संभाषण व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आले.त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना माझ्या दुचाकी वाहनावर व पोनि गोर्डे, पंच क्र. 2 व सापळा पथक शासकीय वाहनाने आमचे मागोमाग आले,मी व पंच असे माझ्या प्लॉट जवळ जावुन थांबलो, सापळा पथक आल्याची खात्री झाल्यावर मी डी पी जवळ गेलो तेथे अष्टेकर व सांगळे असे दोघे उभे होते, अष्टेकर यांनी डी पी ची चावी माझ्याकडुन घेवुन डी पी चे फ्युज बसविले, त्यानंतर मी त्यांच्या समोर 2000/- लाच रक्कम धरुन म्हणालो हे घे मोजुन घे परत मला डोकेदुखी नको असे म्हणालो त्यावेळी अष्टेकर यांनी ती लाच रक्कम उजवे हाताने स्वीकारुन दोन्ही हाताने मोजुन घेतली व त्यांचे पँटच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली त्यावेळी मी सापळा पथकास डोक्यावर हात फिरवुन लाच स्वीकारल्याचा इशारा केला त्यावेळी पोनि गोर्डे, पंच क्र.2 व सापळा पथक तेथे आले व अष्टेकर यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले.

त्यावेळी पोनि गोर्डे यांनी अष्टेकर यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संतोष शांतीनाथ अष्टेकर वय 41 वर्षे, धंदा नोकरी पद कंत्राटी वायरमन,म.रा.वि.वि.कंपनी,सेक्षन जामखेड, रा. तपनेश्वर गल्ली, महेश मेडीकलच्या पाठीमागे, जामखेड ता. जामखेड, जि. अहमदनगर असे सांगीतले.त्यानंतर मला पोनि गोर्डे यांनी जामखेड पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगीतले व ते सर्वजण पुढील कामकाज करणेकामी अष्टेकर यांना घेवुन जामखेड पोलीस स्टेशन येथे गेले मी पण त्यांचे मागोमाग माझ्या दुचाकी वाहनाने पोलीस स्टेशनला आलो. त्याठिकाणी सापळा पथकाने त्यांचे पुढील कामकाज केले.

तरी दि.17/10/2023 रोजी 10/07 वा. ते 11/40 वा. च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या वेळी यातील लोकसेवक संतोष शांतीनाथ अष्टेकर यांनी माझ्या जामखेड येथील राहत्या घराजवळील गट नं 1165/1 माझ्या प्लॉटवरील इमारतीचे बांधकाम सुरक्षीतरित्या करण्यासाठी प्लॉटसमोरील विदयुत वाहिनी पुरवठा खंडीत करण्यासाठी प्रत्येकवेळी 500/- रुपये प्रमाणे लाच मागणी करुन प्रथम फी म्हणुन माझ्याकडुन 500/- रुपये लाच घेतल्याचे मान्य करुन उर्वरीत 2000/- लाच रक्कमेची मागणी करुन आज दिनांक 17/10/2023 रोजी 11.40 वाजेचे दरम्यान माझ्या बांधकाम चालू असलेल्या प्लॉटसमोरील डी पी जवळ ती लाच रक्कम पंचासमक्ष स्वीकारली म्हणुन संतोष शांतीनाथ अष्टेकर वय 41 वर्षे, धंदा नोकरी पद कंत्राटी वायरमन, म.रा.वि.वि.कंपनी,सेक्षन जामखेड, रा. तपनेश्वर गल्ली, महेश मेडीकलच्या पाठीमागे, जामखेड ता. जामखेड, जि. अहमदनगर यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Mahesh Vishnu Patil(I (Inspector)) / API **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

17/10/23

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी स्वाक्षरी)

अजय साठे
पोलीस ठाणे अंमलदार
जामखेड पो.स्टे.

**Name** (नाव): Mahesh Vishnu Pat
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API